# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel : (0253) 2539244/6659244,241,242, Student Helpline : (0253) 2539111/6659111/100

Website: www.muhs.ac.in, E-mail: planning@muhs.ac.in

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ** | **Dr. Rajendra Shivaji Bangal**

एम.बी.बी.एस.,एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी.,एलएल.बी. | M.B.B.S.,M.D.( Forensic Medicine), D.N.B., LL..B.

**कुलसचिव** | **Registrar**


जा.क्र मआविवि/पीबी/४८७/२०२३ दि. १९/०४/२०२३

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नविन महाविद्यालये सुरु करणे / पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे, तसेच पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबतचे प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने सादर करणेबाबत...

## शैक्षणिक अधिसूचना क्र. ११/२०२३

सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की,

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून आरोग्य विज्ञान विषयाचे नविन पदवी महाविद्यालये / नविन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे / पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ करणेसाठी इच्छुक संस्था / महाविद्यालयांनी, मआविवि अधिनियम १९९८ कलम ६४ (३) नुसार, विहित नमुन्यात विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या शुल्कासह (NEFT/RTGS/E-payment Gateway), प्रस्ताव अर्जासोबत जोडलेल्या यादीनुसार परिपूर्ण प्रस्ताव **"MY application"** वर क्लिक करुन ऑनलाईन पध्दतीने ऑक्टोबर २०२३ च्या शेवटच्या दिवसापर्यंत रात्री ११:५९ वाजे पर्यंत सादर करणे आवश्यक आहे, तसेच प्रचलीत पध्दतीनुसार ऑफलाईन पध्दतीने कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या कागदपत्रासह दोन प्रतित बॉक्स् फाईल मध्ये ऑक्टोबर २०२३ च्या शेवटच्या दिवसापर्यंत प्रत्यक्ष आवक विभागात सादर करणे आवश्यक आहे. टपालाद्वारे / कुरीयरद्वारे / ईमेलद्वारे / प्राप्त होणारे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

२. ज्या इच्छुक संस्था / महाविद्यालये यांचेकडून नविन महाविद्यालय सुरु करण्यासाठी / विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीसाठी / नविन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यात येतील. अशा प्राप्त प्रस्तावांना शासनाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता आवश्यकता प्रमाणपत्र / ना हरकत प्रमाणपत्र / शासन निर्णय (लागू असल्यास) प्राप्त होणार नाहीत, अशा संस्था / महाविद्यालयांनी दरवर्षी त्यांच्या प्रस्तावाचे पुनर्जिवन शुल्क विद्यापीठाकडे जमा करुन सदर प्रस्ताव पुनर्जिवित करुन घेणे आवश्यक आहे. असे प्रस्ताव शिफारस केलेले वर्ष वगळता पुढील ५ वर्षासाठीच पुर्नजिवित करुन घेता येतील, म्हणजेच विद्यापीठाने शासनास शिफारस केल्याच्या पत्राच्या दिनांकापासून ६ वर्षानंतर सदर प्रस्ताव नस्तीबंद करण्यात येतील. त्यानंतर संस्थेस वरीलप्रमाणे नव्याने प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास, विहित शुल्कासह नव्याने प्रस्ताव विद्यापीठात सादर करणे आवश्यक राहील.

३. प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने, ज्या संस्थां किंवा महाविद्यालयांना विद्यापीठाने नविन महाविद्यालय किंवा नविन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे / विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीसाठी विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र (Consent of Affiliation) दिले जातील अशा संस्थांना किंवा महाविद्यालयांना विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र

दिलेल्या दिनांकापासून एका वर्षात जर केंद्र शासन / केंद्रीय परिषद / केंद्रीय आयोगाची परवानगी प्राप्त झाली नाही तर अशा संस्थांनी / महाविद्यालयांनी विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्राची शासनाच्या आवश्यकता प्रमाणपत्र / ना-हरकत प्रमाणपत्रानुसार वैधता कालावधी वाढवून घेणे (Extension of Consent of Affiliation) आवश्यक आहे. त्यासाठी संलग्नीकरण शुल्क अधिसूचनेत विहित केलेल्या वैधता वाढ शुल्कासहित विद्यापीठाकडे अर्ज करावेत. विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र दिल्यापासून (Consent of Affiliation) पुढील पाच वर्षासाठी (म्हणजेच संलग्नीकरण संमतीपत्र दिल्याचे प्रथम वर्ष वगळता पुढील पाच वर्ष कालावधी पर्यंत) विद्यापीठ संलग्नीकरण संमतीपत्र पुर्नवैध करुन देण्यात येईल. ६ वर्षानंतर सदर प्रस्ताव नस्तीबंद करण्यात येईल. त्यानंतर संस्थेस वरीलप्रमाणे नव्याने प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास, विहित शुल्कासह नव्याने प्रस्ताव विद्यापीठात सादर करणे आवश्यक राहील.

४. म.आ.वि.विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (२) व (३) नुसार विहित मुदतीत प्राप्त प्रस्ताव अर्जावर कार्यवाही करुन विद्यापीठ प्राधिकरणांच्या योग्य त्या शिफारशींसह प्रस्ताव राज्य शासनास सादर करावयाचे असल्यामुळे, इच्छुक संस्थाचालकांनी परीपुर्ण प्रस्ताव विहित मुदतीत ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे. अपूर्ण प्रस्तावांची पुर्तता विद्यापीठाकडून, करुन घेता येणार नाही.

५. नविन महाविद्यालय सुरु करण्यास इच्छुक असलेल्या संस्था / महाविद्यालयांनी विद्यापीठ यथाथदर्शी योजना २०२२-२७ मधील तरतूदींनुसार आपल्या जिल्हा / महानगरपालिकेकरिता देण्यात आलेल्या रिक्त जागेच्या तक्त्यानुसार प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील.

६. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासूनचे प्रस्ताव सादर करणेसाठी (i) माहिती पुस्तिका (ii) यथार्थदर्शी योजना सन २०२२-२७ (Perspective Plan-2022-27) (iii) संलग्नीकरण शुल्क अधिसूचना क्र. ४२/२०१७ (सुधारीत) (iv) प्रस्ताव अर्ज आणि (v) जिल्हा व महानगरपालिकानिहाय तसेच, विद्याशाखानिहाय रिक्त जागांबाबतच्या माहितीचा तक्ता विद्यापीठ संकेतस्थळावर [http://www.muhs.ac.in] उपलब्ध आहे.

७. ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करतांना प्रस्तावासोबत संस्था नोंदणी, महाविद्यालय/संस्थेची जमीन व रुग्णालय नोंदणी इ. संदर्भात असलेले सर्व दस्तऐवज संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांनी स्वाक्षरीसह सादर करणे बंधनकारक राहील.

८. ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करतांना संस्था / महाविद्यालय यांनी प्रस्ताव खालील नमूद केलेल्या लिंकद्वारे सादर करावयाचे आहे. सदर लिंक दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी रात्री ११.५९ वाजे पर्यंत सुरु असेल. त्यानंतर लिंक स्वंयचलित (Automatic) बंद होईल.

९. प्रस्तावाची विद्यापीठाने शासनास शिफारस न केल्यास, संस्थांनी / महाविद्यालयांनी शुल्क परताव्याची मागणी केल्यास, अशा संस्थेस / महाविद्यालयास विद्यापीठ शुल्क अधिसूचना क्र. ४२/२०१७ (सुधारीत) मधील नमूद तरतुदींन्वये शुल्क परतावा करण्यात येईल.

१०.ऑनलाईन व ऑफलाईन व्यतिरीक्त, टपालाद्वारे / कुरीयरद्वारे/ ई-मेलद्वारे प्राप्त होणारे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत यांची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

११.प्रस्ताव अर्ज ऑनलाईन स्वरुपात कसा सादर करावयाचा आहे. याबाबत प्रात्यक्षिक, सोबत **Demo** स्वरुपात संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१२.संस्था / महाविद्यालये यांनी ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दतीने विहीत कालावधीत प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील. यांची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी.

टीप : १) नविन महाविद्यालय सुरु करणेसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाच्या यथार्थदर्शी योजनेला अनुसरुनच असावेत, अन्यथा प्रस्तावाची शासनास शिफारस केली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेसाठी लिंक-**Application URL – https://automation.muhs.ac.in**

३) प्रस्ताव ऑनलाईन पधतीने सादर करणेकरिता काही तांत्रिक अडचण येत असल्यास, कृपया खालील क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**i)** ०२५३-२५३९१८१, ०२५३-६६५९१८१ (सी-डॅक संस्था प्रतिनिधी)
**Email. ID- muhs.application.helpdesk@gmail.com**

**ii)** ०२५३-२५३९२४१/२४४, ०२५३-६६५९२४१/२४४ (श्री. ग. ना. सुर्यवंशी / श्री. प्र. वा. कोठावदे)
**Email. ID- planning@muhs.ac.in**

ठिकाण : नाशिक

सही/-

दिनांक : १९/०४/२०२३

कुलसचिव

प्रत : विभाग प्रमुख, प्रशासन विभाग } प्रस्ताव विहित मुदतीत स्विकारणेबाबत योग्यती कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539244/6659244,241,242, Student Helpline : (0253) 2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: planning@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस.,एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी.,एलएल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S.,M.D.( Forensic Medicine), D.N.B., LL..B.
Registrar

**Out. No./PB/487/2023** **Dt. 19/04/2023**

**Submission of <u>Online & Offline</u> application for Opening of New College(s) / Starting of New Post Graduate Course(s) / Increase in Intake Capacity in Health Sciences for Under Graduate and Post Graduate course(s) from the Academic Year 2024-25**

## ACADEMIC NOTIFICATION No.11/2023

This is to notify for all concerned that :

1. As per provision u/s 64 (3) of MUHS Act, 1998, the Institute(s) / College(s) which desires to Open New College(s) / Starting of New Post Graduate course(s) / Increase in Intake Capacity in Health Sciences colleges for U.G. & P.G. course(s) from the Academic Year 2024-25, should apply **Online as well as Offline to the University.**
2. **For Online submission of proposal,** the link **"My Application"** is provided on MUHS website with requisite fees. The fees should be paid in the form of NEFT / RTGS / University E-payment Gateway **before the last day of October, 2023. Link for submitting online application shall be inoperative automatically after 23:59 hrs. of the last day of October.**
3. **For offline submission of Proposal,** Application available on website to be filled in duplicate and submit in separate two Box file in the Inward Department of the University head quarter. The proposal should be submitted complete in all respect along with the documents of land, Hospital registration documents and College Building, infrastructure facilities, list of teaching and non-teaching staff etc. in separate two Box file with flagging as mentioned in the check list. Incomplete applications will be summarily rejected and the Proposals received after 31st October, 2023 will not be accepted.
4. Institution(s) / College(s) which are applying for opening of New College(s) / Starting of New Post Graduate Course(s) / Increase in Intake Capacity, but could not obtain Essentiality Certificate / No Objection Certificate / Government Resolution (As applicable) from Maharashtra Government for the Academic Year, 2024-25, should apply every year for revalidation of the proposal by paying revalidation fees as prescribed in Affiliation fees Notification, such proposals can be revalidated up to **5** Years only (i.e. 6 years from the date of recommendation of proposal to the State Government.) After 6 years such proposal(s) will be treated as closed and such institute shall have to apply a fresh along with prescribed fees. (as per revised fees notified from time to time, if desires).
5. Those Institution(s) / College(s) who have received **Consent of Affiliation** of University for Opening of New College(s) / Starting of New PG course(s) / Increase in intake capacity (UG & PG). However, could not obtained Letter of Permission (LOP)

from Central Government / Central Council / Commission within 1 year from the date of its issuance, should require to apply **for Extension of Consent of Affiliation** by paying fees as prescribed in Fee Notification from time to time within five years. Those Institutions / Colleges who could not receive Permission from Central Government / Central Council / Commission **within 6 years from the date of recommendation by the university to the state Government,** then the proposal will be treated as closed and institute shall have to apply a fresh along with prescribed fees. (as per revised fees Notification as prescribed from time to time).

6. The proposal received on or before due date and complete in all respect as per section 64 (2) & (3) of MUHS Act, 1998, shall be forwarded to the State Govt. in a stipulated time period with recommendation of concerned authorities. Incomplete and late submission or attachment of any document will not be considered after **31st October, 2023** at any stage.
7. The College(s) / Institute(s) shall strictly observe the vacancy position of concerned district/Corporation as per the provision in the University Perspective Plan–2022-27 & accordingly submit proposal to the University, to avoid non-recommendation of proposal.
8. For the Submission of proposal for the Academic Year 2024-25 (i) The information Booklet (ii) The Perspective Plan for the period of 2022-2027 (iii) The Affiliation Fees Notification No.42/2017(revised) (iv) The Proposal form and (v) District, Municipal Corporation wise & pathy-wise vacancy position chart is available on University Website i.e. http://www.muhs.ac.in.
9. It is mandatory to submit the supportive documents along with application duly signed by the Chairman / Secretary of the Institute.
10. Other than online and offline applications received in the stipulated time. The Proposal(s) received by Post / Courier / Email will not be accepted, please note.
12. If the proposal is **Not Recommended** to the State Govt. by the University, the fees will be refunded as per the provision mentioned under Fees Notification No. 42 / 2017 (revised) after receipt of request from institute(s) / College(s).
13. Demo of "how to apply online" is given on the MUHS web site for convenience.
14. Institution(s) / College(s) are requested to submit application in both way i.e. online and offline.

**Note : 1) It may please be noted that, the proposal for opening of New College(s) should be as per the existing Perspective Plan 2022-27 of MUHS, otherwise it will be not recommended to the Govt.**

**2) Link for Online Application URL – https://automation.muhs.ac.in**

**3) Incase of technical issue for online submission of application please contact during working hrs on following numbers.**

**i) 0253-2539181, 0253-6659181 (Representative of C-DAC Institute)**
**Email. ID- muhs.application.helpdesk@gmail.com**

**ii) 0253-2539241/244, 0253-6659241/244 (Shri. G. N. Suryavanshi / Shri. P. V. Kothawade)**
**Email. ID- planning@muhs.ac.in**

**Place : Nashik** Sd/-
**Date : 19/04/2023** **Registrar**

**Copy to: Head of the Administration Department** } (Initiate action at your department to submit proposal(s) as per scheduled date and timing)